पोलीस अधिक्षक कार्यालय
गडचिरोली दि. १५/०९/२०१७

# ‘ पोलीस - नक्षल चकमकीत एक जहाल महिला नक्षलवादी ठार ’

उपविभाग पेंढरी कॅम्प कारवाफा अंतर्गत पोमके गट्टा (फु) हद्दीत आज दिनांक १५/०९/२०१७ रोजी गडचिरोली पोलीस दलाचे विशेष अभियान पथक नक्षलविरोधी अभियान राबवित असतांना मौजा भेंडीकन्हार जंगल परिसरात सकाळी ०६.०० वाजेच्या दरम्यान दबा धरुन बसलेल्या अज्ञात नक्षलवादयांनी पोलीस पथकांच्या दिशेने पोलीसांना जिवे मारण्याच्या उद्देशाने अंदाधुंद गोळीबार केला. पोलीसांनी प्रत्युत्तरादाखल स्वसंरक्षणार्थ नक्षलवादयांच्या दिशेने गोळीबार करत चोख प्रतिकार केला. नक्षलवादयांच्या गोळीबारास न जुमानता पोलीस आगेकुच करीत असतांना पोलीसांचा वाढता दबाव पाहून नक्षलवादयांनी घनदाट जंगलाचा फायदा घेत पळ काढला. चकमकीनंतर घटनास्थळावर शोधमोहीम राबविली असता एक जहाल महिला नक्षलवादयांचा मृतदेह व हत्यारासह मोठया प्रमाणात नक्षल साहित्य जप्त करण्यात गडचिरोली पोलीसांना यश आले आहे.

मिळुन आलेल्या मृत महिला नक्षल देहाची ओळख अजून पटली नसून ओळख पटविण्याचे कार्य सुरु आहे.

चकमकीनंतर सदर जंगल परिसरात तीव्र नक्षल विरोधी शोध मोहिम राबविण्यात येत आहे.